क्रमांक : ६६९ / ब कक्ष
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ९ जानेवारी, २०२५.

**प्रेषक :-**

सचिव-१ (कार्यभार),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

**विधानसभेचे सर्व सन्मा. सदस्य**

**विषय: मा.सदस्यांकडून तारांकित प्रश्नांच्या सूचना स्विकारण्याबाबत**

**महोदय/महोदया,**

निदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानसभेच्या **सोमवार, दिनांक ०३ मार्च, २०२५** रोजीपासून सुरु होणाऱ्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक व त्या दिवसाकरिता गटामध्ये समाविष्ट असलेले मा.मंत्री तसेच प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक इत्यादी नमूद असलेला चक्रानुक्रम पत्रक भाग-दोनद्वारे सर्व मा.सदस्यांना **गुरुवार, दिनांक ०९ जानेवारी, २०२५** रोजी **ई-मेलद्वारे** पाठविण्यात आला असून या सचिवालयाच्या **www.mls.org.in** या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करुन देण्यात आला आहे. (प्रत सोबत जोडली आहे.)

**सदरहू अधिवेशनासाठी तारांकित प्रश्न सूचना गुरुवार, दिनांक २३ जानेवारी, २०२५ रोजी सकाळी ११.०० वा. पासून QIS या संगणक प्रणालीवर ऑनलाईन (Online) पध्दतीने स्विकारण्यात येतील. मा.सदस्यांना प्रश्न सूचना स्विकारण्याच्या प्रथम दिनांकापासून चक्रानुक्रमात नमूद केलेल्या विवक्षित उत्तराच्या दिनांकाकरिता प्रश्न सूचना स्विकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्रश्न सूचना या सचिवालयाकडे ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.**

कृपया याची नोंद घ्यावी.

आपली

**( मेघना तळेकर )**
सह सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**याची प्रत माहितीसाठी :-**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये, विधान भवन, मुंबई ४०० ०३२.

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

### गुरुवार, दिनांक ०९ जानेवारी, २०२५ / पौष १९, १९४६ शके

### महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२५ मधील प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांचा चक्रानुक्रम

**१३६.** महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२५ मधील प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाकरिता माननीय मंत्री महोदयांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी माननीय अध्यक्षांनी पुढीलप्रमाणे दिवस नेमून दिले आहेत. ज्या दिनांकास प्रश्नाचे उत्तर हवे असेल तो दिनांक विवरणाच्या स्तंभ (३) मध्ये दर्शविलेला असून त्या दिवशी विचारावयाच्या प्रश्नांच्या सूचना या सचिवालयास मिळण्याचा अखेरचा दिनांक विवरणाच्या स्तंभ (४) मध्ये दर्शविलेला आहे. (प्रश्नाच्या सूचना मिळण्याच्या अखेरच्या दिनांकास सुट्टी असेल त्यावेळी त्या पूर्वीचा दिनांक दर्शविण्यात आला आहे.)

आगामी अधिवेशनासंबंधातील दिनदर्शिकेतील आखलेल्या कार्यक्रमात बदल झाल्यास त्यानुसार प्रस्तुत चक्रानुक्रमात बदल होईल. मा.सदस्यांना प्रश्नांच्या सूचना देण्यास मदत व्हावी म्हणून माननीय मंत्री आणि त्यांच्या अधिन असलेले विभाग यांचे विवरणपत्र सोबत जोडले आहे **(पृष्ठ क्रमांक ३ ते ५ )**

पहिल्या आठवडयातील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट **सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२५** रोजी दुपारी ४.०० वाजता व त्यापुढील आठवडयातील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे बॅलट त्यानंतरच्या प्रत्येक सोमवारी दुपारी ४.०० वाजता सह सचिव / अवर सचिव / अवर सचिव (समिती) यांच्या दालनात घेण्यात येईल. याबाबतची माहिती पत्रक भाग दोनद्वारे स्वतंत्ररित्या मा.सदस्यांना कळविण्यात येईल. सदरहू बॅलटसाठी मा.सदस्यांना उपस्थित राहता येईल, **परंतु त्यांना प्रवास किंवा दैनिक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.**

**:: विवरणपत्र ::**

| गट क्र. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३) | प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| एक | (१) उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य मंत्री<br>(२) शालेय शिक्षण मंत्री<br>(३) अन्न, नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण मंत्री<br>(४) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री<br>(५) पणन, राजशिष्टाचार मंत्री<br>(६) क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री<br>(७) अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री<br>(८) वस्त्रोद्योग मंत्री<br>(९) सहकार मंत्री | सोमवार, दिनांक १० मार्च, २०२५<br>सोमवार, दिनांक १७ मार्च, २०२५<br>* सोमवार, दिनांक २४ मार्च, २०२५ | शुक्रवार, दिनांक ०७ फेब्रुवारी, २०२५<br>शुक्रवार, दिनांक १४ फेब्रुवारी, २०२५<br>* शुक्रवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०२५ |
| दोन | (१) मुख्यमंत्री<br>(२) पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री<br>(३) इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा मंत्री<br>(४) पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री<br>(५) माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री<br>(६) परिवहन मंत्री | मंगळवार, दिनांक ०४ मार्च, २०२५<br>मंगळवार, दिनांक ११ मार्च, २०२५<br>मंगळवार, दिनांक १८ मार्च, २०२५<br>* मंगळवार, दिनांक २५ मार्च, २०२५<br>* मंगळवार, दिनांक ०१ एप्रिल, २०२५ | शुकवार, दिनांक ३१ जानेवारी, २०२५<br>शुकवार, दिनांक ०७ फेब्रुवारी, २०२५<br>शुकवार, दिनांक १४ फेब्रुवारी, २०२५<br>* शुकवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०२५<br>* शुकवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२५ |